# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय,गडचिरोली,
दिनांक : ३०/१०/२०१८

## ‘धुळेपल्ली गावक-यांनी केल्या ०३ भरमार बंदुका जमा’

उप विभाग भामरागड अंतर्गत येणा-या मौजा धुळेपल्ली येथील ग्रामस्थांची मिटिंग पोलीस मदत केंद्र ताडगाव येथील प्रभारी अधिकारी पोउपनि समीर दाभाडे आणि पोउपनि राहुल नामदे, पोउपनि पूनम गोरे व सिआरपीएफ ९ बटालीयन चे पोनि सुनिलकुमार यांनी घेवून ग्रामस्थांना नक्षलवाद किती भयानक असून आपल्या विकासासाठी तो कशाप्रकारे घातक ठरत आहे हे सांगुन नक्षलवादयांना कोणत्याही प्रकारचे सहाय्य ग्रामस्थांनी करु नये असे भावनिक आवाहन केले. त्यामुळे ग्रामीण जनतेत लोकशाही बद्दल व पोलीसांविषयी सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होवून ग्रामस्थांनी पोलीसांनी केलेल्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद देत त्यांच्याकडे असलेल्या ०३ भरमार बंदुका पोलीसांच्या स्वाधिन करुन यापुढे नक्षलवादयांना कोणत्याही प्रकारची मदत न करण्याची शपथ घेतली. पोलीसांच्या वतीने भरमार बंदुका जमा करणा-या ग्रामस्थांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तु देवून सत्कार करण्यात आला.

अति दुर्गम धुळेपल्ली येथील गावक-यांनी त्यांचेकडील भरमार बंदुका जमा करुन नक्षलवादयाविरुध्दच्या कारवाईत मोलाचे सहकार्य केल्याने इतर गावक-यांनी सुध्दा या गोष्टींचा आदर्श घेवून नक्षलविरोधी अभियानात सामिल होण्याचे आवाहन पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री शैलेश बलकवडे यांनी केलेले आहे.